# कर्करोगाबाबत महिलांनी सजग रहावे

## रत्नागिरी येथील कार्यक्रमात डॉ. चैतन्य कोपीकर यांचे आवाहन




रत्नागिरी : कर्करोग निदान आपल्या दारी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मान्यवर.

प्रतिनिधी
रत्नागिरी

कर्करोग प्राथमिक अवस्थेत असताना त्याचा सामना करण्यासाठी महिलावर्गाने सजग व्हावे आणि अन्य महिलांमध्ये जागृती निर्माण करावी, असे आवाहन जागतिक कॅन्सर तज्ज्ञ डॉ. चैतन्य कोपीकर यांनी केले.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाऊंडेशन, पुण्याचे प्रशांती कॅन्सर केअर मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने गोळप व परिसरातील महिलांसाठी आयोजित 'कर्करोग निदान आपल्या दारी' या अभिनव उपक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन चिरायु हॉस्पिटलच्या स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुनीता चव्हाण यांच्याहस्ते करण्यात आले. त्यांनीही कर्करोग प्राथमिक अवस्थेत असतानाच महिलांनी दक्षता बाळगावी असे आवाहन केले. या कार्यक्रमाला डॉ. रमेश चव्हाण, मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया उपस्थित होते. प्रशांती केअर मिशनच्या संचालिका लालेह बुशेरी आपले तज्ज्ञ डॉक्टर, समुपदेशक आणि अद्ययावत तपासणीची उपकरणे असलेली व्हॅन घेऊन या शिबिरासाठी आले आहेत. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत गोळप येथील फिनोलेक्स कॉलनीमध्ये तसेच पंचक्रोशीतील गावांमध्ये जाऊन ही तपासणी केली जाणार आहे.

**कर्करोग निदान आपल्या दारी अभिनव उपक्रम.**

या कार्यक्रमात फिनोलेक्सच्या गोळप येथील कॉलनीच्या महिला मंडळाने महत्त्वाचा पुढाकार घेतला. यावेळी रक्षंदा अन्सारी, डॉ. ज्योती चव्हाण, संचालक एस. एस. मठ, ए. बी. अत्रे, अशोक तातुगडे, डॉ. आशुतोष मुळ्ये, टी. के. काकडे, सागर चिवटे, गौरी क्षीरसागर, अभिषेक साळवी आदींची उपस्थिती होती.

### फिनोलेक्स देणार मेमोग्राफी मशिन

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाऊंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून चिरायु हॉस्पिटल येथे स्त्रियांच्या स्तनाच्या कर्करोगाचे निदान केंद्र सुरु करण्याचे प्रयत्न सुरु आहेत आणि यासाठी लागणारे मेमोग्राफी मशीन फिनोलेक्स इंडस्ट्रीजतर्फे प्रदान करण्यात येणार आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाऊंडेशन गेल्या ५-६ वर्षांपासून दरवर्षी रत्नागिरी व आजूबाजूच्या गावात प्राथमिक आरोग्य शिबीर आयोजित करीत आहेत. दरवर्षी संस्था दोन आरोग्य शिबिरे घेत आहे. यावेळी होणाऱ्या ११व्या प्राथमिक आरोग्य शिबिरात कर्करोग निदान शिबिराचा समावेश करुन जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करत आहेत.

